MAR 2026

तरूण भारत

जनसंपर्क क

शिवाजी विद्यापीठ, क



कोल्हापूर : व्याख्यानात बोलताना कार्यकारी संचालक मल्लिकार्जुन कोरी सोबत डावीकडून डॉ. मोहन वनरोट्टी, डॉ. विलास शिंदे, साजिद हुदली, डॉ. दत्तात्रय साठे.

# केमिकलयुक्त शेतीमुळे निसर्गचक्र बदलले

- मल्लिकार्जुन कोरी यांचे प्रतिपादन
- केआयटी कॉलेजमध्ये कै. शिवाजीराव देसाई स्मृती व्याख्यान

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

केमिकलयुक्त शेतीच्या प्रभावाने निसर्गाचे सर्वच चक्र पालटले आहे. त्यामुळे नागरिकांचे अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे. आपल्या जीवनशैलीत सकस आहाराचा समावेश गरजेचा आहे, असे प्रतिपादन मोआ ॲग्रोटेक, नैरोबी, केनियाचे कार्यकारी संचालक मल्लिकार्जुन कोरी यांनी केले.

केआयटी अभियांत्रिकी (प्रदत्त स्वायत्त) महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने कै. शिवाजीराव देसाई स्मृतीप्रित्यर्थ व्याख्यानात ते बोलत होते. व्याख्यानमालेचे हे २० वे वर्ष आहे. समृद्ध माती– समृद्ध जीवन या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते.

कोरी म्हणाले, भारताचे पूर्वीचे शिक्षण हे जमिनीशी नाते जोडणारे (सॉईल बेस्ड) होते. तोपर्यंत भारतातील शेती ही उपजाऊ तसेच विविध प्रकारच्या पिकांसाठी अत्यंत गुणकारी होती. जसे जसे आपले शिक्षण ऑइल, केमिकल (ऑईल बेस्ड) यांच्याशी जोडले गेले तसे तसे आपले जमिनीकडील लक्ष कमी होत ते खनिज पदार्थांकडे केंद्रित केले गेले.

संस्थेचे संचालक डॉ. मोहन वनरोट्टी यांनी प्रास्ताविक केले. संस्थेचे अध्यक्ष साजिद हुदली, रजिस्टर डॉ. दत्तात्रय साठे यावेळी मंचावर उपस्थित होते. संस्थेचे उपाध्यक्ष सचिन मेनन, सचिव दीपक चौगुले यांनी मार्गदर्शन केले. डॉ. दीप्ती कुलकर्णी यांनी सुत्रसंचालन केले. प्रा. नीता पाटील यांनी आभार मानले. प्रा. अमर टिकोळे यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले.

यावेळी केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालय व आयमआरचे सर्व अधिष्ठाता, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी, परिसरातील उद्योजक व अन्य विद्यार्थी उपस्थित होते.

2 8 MAR 2026

पुढारी

# ऑनलाईन एमबीए अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेस सोमवारपर्यंत मुदत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग व ए.आय.सी.टी.ई. मान्यताप्राप्त ऑनलाईन एम.बी.ए. अभ्यासक्रम जानेवारी-फेब्रुवारी २०२६ सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. अर्ज प्रक्रिया सोमवारी (दि. ३०) सुरू राहणार आहे, अशी माहिती संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली. यूजीसीच्या वतीने ऑनलाईन एम.बी.ए. अभ्यासक्रम गेल्या वर्षापासून सुरू आहे. अभ्यासक्रम प्रवेश, अध्ययन, परीक्षा व निकालपर्यंत असणारी शैक्षणिक प्रक्रिया ही ऑनलाईन आहे.

# डॉ. आर. के. कामत यांची तंत्रज्ञान विद्यापीठ प्रभारी कुलगुरू म्हणून नियुक्ती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरेचे प्रभारी कुलगुरू म्हणून प्रा. डॉ. आर. के. कामत यांनी नुकताच पदभार स्वीकारला. त्यांच्या नियुक्तीमुळे शिवाजी विद्यापीठासह शैक्षणिक क्षेत्रातून आनंद व्यक्त केला जात आहे.

प्रा. कामत यांना २८ वर्षांहून अधिक कालावधीचा अध्यापन, संशोधन व प्रशासनाचा अनुभव आहे. सध्या ते डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबईचे कुलगुरू म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे विज्ञान व तंत्रज्ञान संकुलाचे अधिष्ठाता व संगणक विज्ञान विभागप्रमुख म्हणून महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. यापूर्वी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, आर्किटेक्चर अँड डिझाईन येथे प्रभारी कुलगुरू म्हणून यशस्वीपणे काम पाहिले आहे.

8 MAR 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. जयसिंगराव पवार प्रमाण इतिहास लिहिणारे इतिहासकार

## प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव; विद्यापीठात शोकसभा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

डॉ. जयसिंगराव पवार इतिहासाचे संशोधन व लेखन हे जीवनकार्य म्हणून अखंड संशोधन करीत होते. डॉ. पवार प्रमाण इतिहास लिहिणारे इतिहासकार होते. त्यादृष्टीने त्यांनी आयुष्यभर वाटचाल केली. शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्रास त्यांनी भरीव योगदान दिले. त्यांच्या निधनामुळे इतिहासाची, शिवाजी विद्यापीठाची न भरून येणारी हानी झाली आहे, अशी भावना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी व्यक्त केली.

डॉ. जयसिंगराव पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये शोकसभेचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी त्या बोलत होत्या. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनल म्हणाले, डॉ. पवार दस्तऐवजांना महत्त्व देणारे, वस्तुनिष्ठ इतिहासाची मांडणी करणारे मान्यताप्राप्त इतिहासकार होते. आवश्यक तेव्हा इतिहाससंदर्भातील घडामोडींबाबत निर्णायक मत व्यक्त करत होते. डॉ. पवार यांनी व्यक्त केलेल्या मताला राज्यात महत्त्वाचे स्थान होते. इतिहासाच्या क्षेत्रामध्ये संशोधन करणाऱ्या संशोधकांनी इतिहासाचा वारसा पुढे नेहणे ही मोठी जबाबदारी आहे.




**कोल्हापूर : डॉ. जयसिंगराव पवार यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आयोजित शोकसभेत बोलताना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव. (छाया : पप्पू अत्तार)**

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन शिंदे यांनी शोकप्रस्तावाचे वाचन केले.

वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागप्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, डॉ. निलांबरी जगताप, डॉ. देविकाराणी पाटील, सचिन घोरपडे यांनी शोकभावना व्यक्त केल्या. यावेळी व्यवस्थापन परिषद सदस्य अमरसिंग रजपूत, अधिविभागप्रमुख, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, इतिहासप्रेमी विद्यार्थी उपस्थित होते.

28 MAR 2026 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. जयसिंगराव पवार यांचे शाहू संशोधन केंद्रात भरीव योगदान

## प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव : विद्यापीठातील शोकसभेत आदरांजली

कोल्हापूर, ता. २७ : 'ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांनी आयुष्यभर इतिहासाचे संशोधन आणि लेखन केले. ते प्रमाण इतिहास लिहिणारे इतिहासकार होते. त्यादृष्टीने त्यांनी संपूर्ण आयुष्यभर वाटचाल केली. शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्रामध्ये त्यांनी भरीव योगदान दिले. त्यांच्या निधनाने विद्यापीठाची न भरून येणारी हानी झाली असल्याची भावना प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी आज व्यक्त केली.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये आज शोकसभेत डॉ. पवार यांना आदरांजली वाहण्यात आली. इतिहास अधिविभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील म्हणाले, 'डॉ. पवार दस्तऐवजांना महत्त्व देणारे, वस्तुनिष्ठ इतिहासाची मांडणी करणारे मान्यताप्राप्त इतिहासकार होते. आवश्यक तेव्हा इतिहासासंदर्भातील घडामोडींबाबत ते निर्णायक मत व्यक्त करीत होते. त्यांनी व्यक्त केलेल्या मताला संपूर्ण महाराष्ट्र राज्यात महत्त्वाचे स्थान होते. इतिहासाच्या क्षेत्रामध्ये संशोधन करणाऱ्या संशोधकांनी इतिहासाचा वारसा पुढे नेणे ही मोठी जबाबदारी आहे.' कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी शोक प्रस्तावाचे वाचन केले. वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागप्रमुख डॉ. श्रीकृष्ण महाजन, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रघुनाथ ढमकले, निलांबरी जगताप, देविकाराणी पाटील, सचिन घोरपडे यांनी शोक भावना व्यक्त केल्या.

2 8 MAR 2026 पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात आज शिव महोत्सव

## डॉ. संजय डी. पाटील यांना शिव-जीवन गौरव पुरस्कार

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी स्नेहमेळावा कृती समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे 'शिव महोत्सव २०२६' या भव्य सांस्कृतिक महोत्सवाचे शनिवारी (दि. २८) सायंकाळी ५ वाजता आयोजन केले आहे. विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊसाहेब सभागृहात होणाऱ्या या महोत्सवाचे उद्घाटन 'अंनिस'च्या राज्याध्यक्ष सरोज पाटील यांच्या हस्ते होणार असून, खा. शाहू छत्रपती महाराज अध्यक्षस्थानी असतील. ही माहिती महोत्सवाचे प्रवर्तक डॉ. प्रवीण कोडोलीकर, संयोजन समितीचे अध्यक्ष मंजित माने, उपाध्यक्ष शुभम शिरहट्टी यांनी दिली.



यंदा महोत्सवाचे २१ वे वर्ष असून, या वर्षीचा शिव-जीवन गौरव पुरस्कार डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांना, तर शिव-सेवा पुरस्कार भरत लाटकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. अनिल लवेकर यांचा पंचाहत्तरीनिमित्त विशेष सत्कार करण्यात येणार आहे. यंदा 'जल्लोष तरुणाईचा' या संकल्पनेतून युवकांच्या कलागुणांना व्यासपीठ देण्याचा प्रयत्न केला आहे. 'शिंदेशाही' हा कार्यक्रम यंदाचे विशेष आकर्षण असून, यामध्ये गायक आनंद शिंदे, उत्कर्ष शिंदे यांचे सादरीकरण होणार आहे. सार्थक क्रिएशन्सच्या वतीने 'लोककलेचा आविष्कार' या विशेष सत्रात पारंपरिक लोककला सादर केली जाणार आहे. या सांस्कृतिक सोहळ्याच्या प्रवेशिकांसाठी आयोजकांशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

2 8 MAR 2026
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात आज रंगणार शिवमहोत्सव

## डॉ. संजय डी. पाटील यांचा होणार शिव-जीवन गौरव पुरस्काराने सन्मान : महोत्सवात शिंदेशाही मुख्य आकर्षण

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी स्नेह मेळावा कृती समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही 'शिव महोत्सव २०२६" या भव्य सांस्कृतिक महोत्सवाचे आज आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती महोत्सवाचे प्रवर्तक डॉ. प्रविण कोडोलीकर आणि संयोजन समितीचे अध्यक्ष मंजीत माने, उपाध्यक्ष शुभम शिरहट्टी यांनी दिली आहे.



डॉ. संजय डी. पाटील

महोत्सवात परंपरा, संस्कृती आणि आधुनिक कलाविष्कार यांचा संगम अनुभवायला मिळणार आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्याध्यक्ष श्रीमती सरोज पाटील (माई) यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन होणार असून खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज अध्यक्षस्थानी असणार आहेत. शनिवार दि.२७ रोजी सायंकाळी ५ वाजता विद्यापीठाच्या राजमाता जिजाऊ साहेब सभागृहात कार्यक्रमाला सुरूवात होणार आहे.

यंदा महोत्सवाचे २१ वे वर्ष असून, यंदाचा शिव-जीवन गौरव पुरस्कार डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांना, तर शिव-सेवा पुरस्कार भरत लाटकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. यावेळी अनिल लवेकर यांचा पंचाहत्तरीनिमित्त विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

सार्थक क्रिएशन्सच्या वतीने 'लोककलेचा आविष्कार" या विशेष सत्रात पारंपरिक लोककला सादर केली जाणार असून, उपस्थितांना समृद्ध सांस्कृतिक अनुभव मिळणार आहे. याखेरीज विविध कलाकार आणि विद्यार्थी गट आपल्या कलागुणांचे सादरीकरण करणार आहेत.

या कार्यक्रमाला शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, पेठवडगाव नगराध्यक्ष विद्याताई पोळ, निवासी जिल्हाधिकारी गजानन गुरव, समाज कल्याण विभागाचे साहाय्यक आयुक्त सचिन साळे, उच्च शिक्षण विभागाचे सहसंचालक प्रकाश बच्छाव, प्रताप ऊर्फ भैय्या माने, डॉ. अजितसिंह जाधव, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे उपस्थित राहतील. कार्यक्रमाची प्रवेशिका मोफत असून इच्छुकांनी आयोजकांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### 'जल्लोष तरुणाईचा'

यंदा शिव महोत्सवात 'जल्लोष तरुणाईचा" या संकल्पनेतून युवकांच्या कलागुणांना व्यासपीठ देण्याचा प्रयत्न केला आहे. गीत, नृत्य, लोकसंगीत तसेच विविध सांस्कृतिक सादरीकरणांचा बहारदार कार्यक्रम सादर होणार आहे. 'शिंदेशाही" हा कार्यक्रम यंदाचे विशेष आकर्षण असून यामध्ये महाराष्ट्राचे लोकप्रिय गायक आनंद शिंदे आणि गायक उत्कर्ष शिंदे यांच्या सादरीकरणामुळे रंगत अधिक वाढणार आहे.

MAR 2026 पुढारी

जनसंपर्क
शिवाजी विद्यापी

# शिवाजी विद्यापीठात आज रंगणार शिव महोत्सव

## डॉ. संजय डी. पाटील यांना शिव-जीवन गौरव पुरस्कार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ आजी-माजी विद्यार्थी स्नेह मेळावा कृती समितीच्या वतीने शिव महोत्सव २०२६ सांस्कृतिक महोत्सवाचे (दि. २८) रोजी सायंकाळी ५ वाजता आयोजन केले आहे, अशी माहिती महोत्सवाचे प्रवर्तक डॉ. प्रवीण कोडोलीकर, संयोजन समितीचे अध्यक्ष मंजित माने, उपाध्यक्ष शुभम शिरहट्टी यांनी दिली.

महोत्सवाचे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या राज्याध्यक्ष सरोज पाटील यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. खासदार शाहू महाराज अध्यक्षस्थानी असतील. यंदा महोत्सवाचे २१ वे वर्ष असून, या वर्षीचा शिव-जीवन गौरव पुरस्कार डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठाचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील यांना, तर शिव-सेवा पुरस्कार भरत लाटकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. याप्रसंगी अनिल लवेकर यांचा पंचाहत्तरीनिमित्त विशेष सत्कार करण्यात येणार आहे.

यावेळी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, पेठवडगाव नगराध्यक्ष विद्या पोळ, निवासी जिल्हाधिकारी गजानन गुरव, समाज कल्याण विभाग सहायक आयुक्त सचिन साळे, उच्च शिक्षण विभाग सहसंचालक प्रकाश बच्छाव, डॉ. अजितसिंह जाधव आदी उपस्थित राहणार आहेत.